**सहाय्यक आरेखक (गट-क) संवर्गातून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क) या संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती.**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [पूर्व], मुंबई- ४०० ०५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/कनि.अभि./२०२६/ /प्र.८**
**दिनांक :-**

## आदेश

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **सहाय्यक आरेखक (गट-क)** या संवर्गातील खालील नमूद कर्मचारी यांची खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क)** या संवर्गात **एस-१५ (रु.४१८०० - रु.१३२३००)** या वेतनस्तरामध्ये तदर्थ, पूर्णपणे तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव | सद्याचे कार्यालय | पदोन्नती नंतरचे कार्यालय व मंडळ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. स्वप्निल शिवराम जाधव | मुंबई मंडळ | कार्यकारी अभियंता/ग-दक्षिण/ मुं.इ.दु. व पु.मंडळ | रिक्त पदी |

**२/-** सदरहू, कर्मचारी यांची कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क) या संवर्गात तात्पुरत्या पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेली पदस्थापना ही प्राधिकरण ठराव क्र.७११९ दि.१४.१०.२०२४ अन्वये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क) या संवर्गातील शासनाकडून सदरहू दि.०३.१२.२०२० रोजीच्या सेवाप्रवेश नियमामधील सुधारणेच्या अधिन राहून या अटीवर करण्यात येत आहे.

**३/-** श्री. स्वप्निल शिवराम जाधव, सहाय्यक आरेखक, मुंबई मंडळ यांनी प्रशासन विभागास दिनांक- १०.०२.२०२६ रोजी सादर केलेल्या सुयोग्य स्वरुपातील हमीनामामधील अटी व शर्ती त्यांचेवर बंधनकारक राहतील.

**४/-** संबंधित पदोन्नत पदाधिकारास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील. सदरहू कर्मचारी यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

**५/-** शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक]/सेवा-३, दिनांक ०६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

**६/-** संबंधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**७/-** उक्त आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

**८/-** पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थानेच्या जागी तात्काळ रुजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच याबाबत शासन निर्णय दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. प्रशासकिय निकड व कार्यभाराच्य आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवाजेष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील

**९/-** उपरोक्त कर्मचाऱ्यांची कनिष्ठ संवर्गातील सेवाजेष्ठता वरिष्ठ संवर्गात अबाधित राहील.

**१०/-** मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीचा कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पुर्तता होत नसल्याने आढळून आल्यास पदोन्नती आदेश रद्द करण्यात येतील.

**११/-** सदरहू कर्मचारी यांनी दि.३१.०३.२०२५ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्व भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरित करण्यात येऊन नयेत, तसेच आदेश हस्तांतरित करण्यापूर्वी सदर कर्मचाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.

**१२/-** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील शासनाकडून दि.०३.१२.२०२० रोजीच्या सेवाप्रवेश नियमामधील सुधारणेच्या अटी पदोन्नत कर्मचारी श्री. स्वप्निल शिवराम जाधव यांच्यावर बंधनकारक राहतील.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांच्या मान्यतेने.**

Digitally signed by
PRAFULL JAYARAJ THAKUR
Date: 09-03-2026
16:55:20

**(प्रफुल्ल ठाकूर)**
**सचिव/प्राधिकरण**

**प्रति,**

श्री. स्वप्निल शिवराम जाधव, सहायक आरेखक/मुंबई मंडळ
**(मा. मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ यांचे मार्फत )**

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :</u>**

१. मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मा.मुख्य अभियंता-१,२,३/प्रा.

३. मा.मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
४. वित्त नियंत्रक/प्रा.
५. विधी सल्लागार/प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८. सहमुख्य अधिकारी /मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
९. उपमुख्य अभियंता/परि-२/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१०. कार्यकारी अभियंता/ग-दक्षिण/ मुं.इ.दु. व पु.मंडळ
११. वास्तुशास्त्रज्ञ/रचनाकार/मुंबई मंडळ
१२. चौकशी अधिकारी/प्रा.
१३. मुख्य लेखाधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१४.लेखाधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१६. संचालक, पी.डी.सी. पुणे
१७. मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)

**प्रत-** प्रशासकीय अधिकारी/ प्रा./मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ

**प्रत-** कार्यासन अधिकारी- क-शाखा, मुंबई मंडळ, सचिव/मुंबई मंडळ

**<u>प्रत माहितीसाठी :-</u>**

१. मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक.
२. प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.
३. प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
४. प्रत, अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
५. प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई.
६. प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई.

**प्रत :-** प्रशासन-५/६/७/८/९/१०/१२/१३/१४-अ/१४-ब/१५/१६/१७/प्रा.

---***---